लोकमत



## आठ स्थानकांवर बारा देशी प्रजातींच्या झाडांची लागवड

# मेट्रो लावणार एक हजार झाडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून येत्या काही महिन्यांत कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो ३ च्या कफ परेड ते ग्रँट रोड या आठ स्थानकांवर बारा देशी प्रजातींची तब्बल एक हजार झाडे लावण्या येणार आहे. त्यामुळे मुंबईमधील पर्यावरण संवर्धनास आणखी हातभार लागेल आणि या निमित्ताने मुंबई अधिकाधिक हिरवीगार होईल, असा दावा केला जात आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे कुलाबा - वांद्रे - सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रोचे काम हाती घेण्यात आले असून, आजघडीला एकूण भुयारीकरणापैकी ९८ टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण झाल्याचा दावा कॉर्पोरेशनने केला आहे, तर संपूर्ण प्रकल्पाचे काम ७२ टक्के एवढे झाले असून, स्थानकांची कामे देखील वेगाने सुरू असल्याची माहिती कॉर्पोरेशनकडून देण्यात आली.



३३.५ कि.मी. लांबीचा हा मेट्रो मार्ग उपनगरीय रेल्वेमधील गर्दी कमी करु शकतो.

मुंबई मेट्रो ३ प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर रहदारीचे प्रमाण कमी होईल.

- प्रकल्पामुळे सुमारे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होईल.
- **मेट्रो ३ ही वांद्रे कुर्ला संकुलात मेट्रो २ ब ला जोडली जाईल.**
- मेट्रो १ ला मरोळ, मेट्रो ६ ला आरे येथे मेट्रो ३ जोडली जाईल.
- **मुंबईच्या रेल्वेतून सुमारे ७५ लाख प्रवाशांना रोजचा प्रवास करावा लागतो.**